दि. 24.08.2017

# निवदेन

मा. तहसिलदार साहेब,
आष्टी ता. आष्टी जि. बीड.

विषय - आष्टी तालुका अंतर्गत येणा-या सर्व बस स्थानंकांमधील महिला स्वच्छतागृहांच्या नुतनीकरणाबाबत.

अर्जदार - रणरागिणी संघटना अध्यक्षा - प्रा. नाथ मिरा

महोदय,

वरील विषयास अनुसरुन विनंती की, शेकडो विद्यार्थीनींच्या वारंवार मिळालेल्या लेखी तक्रारी वरुन विनंती करु इच्छीते की, आष्टी तालुक्यातील सर्व बस स्थानंकांमधील महिला स्वच्छतागृहांची अवस्था खुप दैनिय आहे. त्यामुळे त्वरीत सुधारणा व्हावी कारण आष्टी तालुक्यातील कडा, आष्टी, पाटोदा हे गांवे शिक्षणाच्या दृष्टीने महत्वाची गावे आहेत. येथे आसपासच्या सर्व खेडयातील शेकडो विद्यार्थीनी शिक्षणासाठी ये जा करतात. त्यामुळे त्यांना बस स्थानकावर बससाठी तासनतास थांबावे लागते कारण बस वेळेवर येत नाहीत आणि काही गावांसाठी तर एकच बस आहे. बस स्थानकापासून शाळा , महाविद्यालये 2 ते 3 कि.मी. अंतरावर आहेत. त्यामुळे विद्यार्थीनींच्या दृष्टीने चांगले स्वच्छतागृह असणे खुप महत्वाचे आहे.

तरी लवकरात लवकर बस स्थानकांवरील महिला स्वच्छतागृहांचे नुतनीकरण त्वरीत करुन तेथे पाण्याची सोय करावी. कारण शेकडो विद्यार्थीनींच्या आरोग्याचा प्रश्न आहे. त्यासाठी आपण त्वरीत योग्य तो निर्णय घेऊन सहकार्य करावे ही नम्र विनंती.

अध्यक्षा,
"रणरागिनी संघटना",
प्रा. मिरा नाथ

माहितीस्तव प्रत -

1. मा. दिवाकर रावते साहेब ( परीवहन मंत्री )
2. मा. पंकजाताई मुंढे ( पालकमंत्री बीड )

28.8.17
आवक-जावक लिपीक
तहसिल कार्यालय;आष्टी

दि. 28.08.2017

# निवदेन

मा. पोलीस उपधिक्षक साहेब,
आष्टी ता. आष्टी जि. बीड.

विषय - आष्टी तालुका अंतर्गत येणा-या सर्व बस स्थानंकांमधील महिला स्वच्छतागृहांच्या नुतनीकरणाबाबत.

अर्जदार - रणरागिणी संघटना अध्यक्षा - प्रा. नाथ मिरा

महोदय,

वरील विषयास अनुसरुन विनंती की, शेकडो विद्यार्थीनींच्या वारंवार मिळालेल्या लेखी तक्रारी वरुन विनंती करु इच्छीते की, आष्टी तालुक्यातील सर्व बस स्थानंकांमधील महिला स्वच्छतागृहांची अवस्था खुप दैनिय आहे. त्यामुळे त्वरीत सुधारणा व्हावी कारण आष्टी तालुक्यातील कडा, आष्टी, [illegible] हे गांवे शिक्षणाच्या दृष्टीने महत्वाची गावे आहेत. येथे आसपासच्या सर्व खेडयातील शेकडो विद्यार्थीनी शिक्षणासाठी ये जा करतात. त्यामुळे त्यांना बस स्थानकावर बससाठी तासनतास थांबावे लागते कारण बस वेळेवर येत नाहीत आणि काही गावांसाठी तर एकच बस आहे. बस स्थानकापासून शाळा , महाविद्यालये 2 ते 3 कि.मी. अंतरावर आहेत. त्यामुळे विद्यार्थीनींच्या दृष्टीने चांगले स्वच्छतागृह असणे खुप महत्वाचे आहे.

तरी लवकरात लवकर बस स्थानकांवरील महिला स्वच्छतागृहांचे नुतनीकरण त्वरीत करुन तेथे पाण्याची सोय करावी. कारण शेकडो विद्यार्थीनींच्या आरोग्याचा प्रश्न आहे. त्यासाठी आपण त्वरीत योग्य तो निर्णय घेऊन सहकार्य करावे ही नम्र विनंती.

अध्यक्षा, प्रा. नाथ मिरा
रणरागिनी संघटना,
ता. आष्टी, जि. बीड

माहितीस्तव प्रत -

1. मा. दिवाकर रावते साहेब ( परीवहन मंत्री )
2. मा. पंकजाताई मुंढे ( पालकमंत्री बीड )

श्री अमोलक जैन विद्या

**श्रीमती शांताबाई कांतीलाल गांधी कला ,अमोलक विज्ञान ,**
**पनालाल हिरालाल गांधी वाणिज्य महाविद्यालय**
कडा , ता.आष्टी , जि.बीड
नॅक समितीतर्फे " ब " दर्जा प्राप्त
Email ID- gandhicollegekada_1996@yahoo.co.in

प्र.प्राचार्य डॉ.एस.एस.पाताळे
एम.एस्सी,बी.एड, पीएच.डी.

स्थापना १९९६

दि - २२/०९/२०१७

जा.क. 193
२०१७-२०१८

प्रति,
मा.संयोजक
युवा निर्माण प्रकल्प ,
स्नेहालय अहमदनगर

विषय :- महाविद्यालयातील विद्यार्थी , विद्यार्थीनीनां सामाजिक जाणीव युवा संवाद कार्यशाळेसाठी पाठविण्याबाबत

महोदय,

वरील विषयास अनुसरुन विनंती करण्यात येते की, दिनांक २३ व २४ सप्टेबर २०१७ रोजी होणा-या " सामाजिक जाणीव युवा संवाद " कार्यशाळा ( स्नेहालय अहमदनगर ) साठी आमचे महाविद्यालयाचे विद्यार्थी पाठवत आहोत . तरी त्यांना सहभागी करुन घ्यावे ही विनंती.

Principal
S.A.J.V.P.M'S, Kada's,
S.K. Gandhi Arts, Amolak Science
P.H. Gandhi Commerce College, kada

* सहभागी प्राध्यापक *

१. प्रा.डॉ.अशोक कोरडे
२. प्रा.श्रीम.मिरा नाथ

* सहभागी विद्यार्थी *

| | |
|---|---|
| १.सय्यद अन्सार गफुर | एम.एस्सी द्वितीय वर्ष |
| २.ननवरे जयदिप किसन | एम.एस्सी द्वितीय वर्ष |
| ३.कु.जाधवर शिवनंदा बबन | एस.वाय.बी.कॉम. |
| ४.कु.जाधवर प्रियंका रमेश | एफ. वाय.बी.एस्सी |
| ५.कु.जगताप शिवकांती संजय | एस.वाय.बी.ए. |
| ६.कु.भालेकर ज्योती दिलीप | एस.वाय.बी.कॉम. |
| ७.कु.आंबेकर प्रिया हरिभाऊ | एफ. वाय.बी.एस्सी |
| ८.कु.शेंडगे शुभम झुंबर | एफ. वाय.बी.एस्सी |
| ९.थोरवे अनिकेत रामदास | एफ. वाय.बी.एस्सी |

युवा निर्माण प्रकल्प स्नेहालय अ.नगर स्थापना २००४-०५


Snehalaya
English Medium School


GRATITUDE






महिला दिन
8 मार्च 2018


श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ, कडा
"ये सुवासिनी तुला कुंकू लावते ,
सौभाग्याच दान मागते"




बी.सी.ए.

।। पढमं नाणं तओ दया ।।

श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ कडा संचलित

# श्रीमती शांताबाई कांतीलाल गांधी कला ,अमोलक विज्ञान व पनालाल हिरालाल गांधी वाणिज्य महाविद्यालय



**कडा , ता.आष्टी , जि.बीड**

Email ID- gandhicollegekada_1996@yahoo.co.in

स्थापना 1996

प्राचार्य - डॉ.एन. एस. राठी
एम.कॉम.एम.फिल.पीएच.डी.

जा.क्र. 493
2018-2019

दि. 07 / 03 /2019

प्रति ,

मा. निलीमा थेऊरकर

नायब तहसिलदार ,

आष्टी ता. आष्टी जि. बीड.

**विषय - 'जागतिक महिला दिनानिमित्त ' प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणेबाबत.**

महोदय,

वरील विषयी विनंती करण्यात येते की, आमच्या महाविदयालयात दि.08.03.2019 रोजी सकाळी ठीक 11.30 वाजता **'जागतिक महिला दिनानिमित्त** 'कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी सदरील कार्यक्रमासाठी आपण दि. 08.03.2019 रोजी सकाळी ठीक 11.30 वाजता प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून सहकार्य करावे ही विनंती.

Principal
S.A.J.V.P.M.Kada's
Smt.S.K.Gandhi Arts, Amolok Science
P.H.Gandhi Commerce College, Kada

7-3-19
आवक-जावक लिपीक
तहसिल कार्यालय,आष्टी




गांधी महाविद्यालय, कडा
महिला दिन
८ मार्च २०१९
अध्यक्ष
प्रमुख मार्गदर्शक:


गांधी महाविद्यालय, कडा
जागतिक महिला दिन
८ मार्च २०१९
कार्यक्रमाचे अध्यक्ष :
मा. प्राचार्य डॉ. एन.एस.राठी
प्रमुख मार्गदर्शक :
मा. नीलीमा थेऊरकर
(नायब तहसीलदार, आष्टी)
मा. दीपाताई दोनडे
(सरपंच, कडा)


गांधी महाविद्यालय, कडा
जागतिक महिला दिन
८ मार्च २०१९
कार्यक्रमाचे अध्यक्ष :
मा. प्राचार्य डॉ. एन.एस.राठी
प्रमुख मार्गदर्शक :
मा. नीलीमा थेऊरकर

दैनिक दिव्य मराठी

बीड, शुक्रवार, १५ मार्च २०१९ | ४

**कार्यक्रम** • नायब तहसीलदार नीलिमा थेऊरकर यांचे गांधी महाविद्यालयात प्रतिपादन

# 'महिला धैर्याने संकटांचा सामना करतात'

प्रतिनिधी | आष्टी

महिलांनी दृढ निश्चिय होऊन,कठिण प्रसंगाला सामोरे जावे,महिला कोठेच कमी नाहीत,असे प्रतिपादन आष्टीच्या नायब तहसिलदार निलीमा थेऊरकर यांनी केले. कडा येथील अमोलक जैन विद्या प्रसारकच्या गांधी महाविद्यालयात आंतर राष्ट्रीय महिलादिनाच्या निमित्त त्या बोलत होत्या.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रचार्य नंदकुमार राठी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कडा ग्रामपंचायतचे सरपंच दिपमाला अनिल ढोबळे ह्या होत्या. व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य जवाहरलाल भंडारी, राणरागिणी संघटनेच्या आष्टी तालुकाध्यक्षा प्रा.मिरा नाथ, प्रा. धनश्री मुनोत, नवनाथ कराळे, अशिषकुमार कटारिया,हिरालाल लुणावत, अशोक खाडे यांच्यासह आदि मान्यवर उपस्थित होते.



आष्टी : कडा येथील कार्यक्रमात बोलताना नायब तहसीलदार थेऊरकर.

थेऊरकर म्हणाल्या,फक्त नोकरीत शिक्षणात नव्हे तर घरातही स्त्रीयांना समानतेची वागणूक मिळाली पाहिजे,स्त्री खुप यशस्वी होऊ शकते त्यासाठी पिता,पति,भाऊ यांनी तिला चांगल्या कामासाठी मागे न खेचता यशस्वी होण्यासाठी प्रोत्साहित करण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.यावेळी रणरागिनी संघटनेच्या तालुकाध्यक्ष प्रा.मिरा नाथ म्हणाल्या,आम्ही तालुक्यात रणरागिणी संघटनेच्या माध्यमातून महाविद्यालीय तरुणींना असलेल्या अडचणी सोडवित असून,त्यांना विविध स्पर्धोत्मक परिक्षेचे ज्ञान मिळविण्यासाठी मार्गदर्शन कॅम्पही आयोजित करत असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी सुनिता बोंबे,सुवर्णा देशमुख,पदमा औताडे,जनाबाई पवळ,शिवराज पातळे,सुनिल पंढरे, सुदाम जाधव,रंजना जोशी,प्रियंका बोदार्डे यांच्यासह आदिनी सहकार्य केले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.धनश्री मुनोत यांनी केले तर आभार नंदा राऊत यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते.

## विविध उपक्रम

महिला दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या वतीने आठवडाभर विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नायब तहसीलदार थेऊरकर यांनी स्पर्धा परिक्षेबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

महत्वाचे...

# महिला कुठेच कमी नाहीत – नायब तहसिलदार थेऊरकर

आष्टी,दि.१६(प्रतिनिधी):-महिलांनी दृढ निश्चय होऊन,कठिण प्रसंगाला समोरे जावे,महिला कोठेच कमी नाहीत असे प्रतिपादन आष्टीच्या नायब तहसिलदार निलीमा थेऊरकर यांनी केले.

आष्टी तालुक्यातील कडा येथील अमोलक जैन विद्या प्रसारकच्या गांधी महाविद्यालयातआंतरराष्ट्रीय महिलादिनाच्यानिमित्त त्या बोलत होत्या.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार राठी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कडा ग्रामपंचायतचे सरपंच दिपमाला अनिल ढोबळे ह्या होत्या.तर व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य जवाहरलाल भंडारी, रणरागिणी संघटनेच्या आष्टी तालुकाध्यक्षा प्रा.मिरा नाथ ,प्रा. धनश्री मुनोत,नवनाथ कराळे, अशिषकुमार कटारिया, हिरालाल लुणावत,अशोक खाडे यांच्यासह आदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलतांना थेऊरकर म्हणाल्या,फक्त नोकरीत शिक्षणात नव्हे तर घरातही स्त्रीयांना समानतेची वागणूक मिळाली पाहिजे,स्त्री खुप यशस्वी होऊ शकते त्यासाठी पिता,पति,भाऊ यांनी तिला चांगल्या कामासाठी मागे न खेचता यशस्वी होण्यासाठी प्रोत्साहित करण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.यावेळी रणरागिनी संघटनेच्या तालुकाध्यक्ष प्रा.मिरा नाथ म्हणाल्या,आम्ही आष्टी तालुक्यात रणरागिणी संघटनेच्या माध्यमातून महाविद्यालीय तरुणींना असलेल्या अडचणी सोडवित असून,त्यांना विविध स्पर्धात्मक परिक्षेचे ज्ञान मिळविण्यासाठी मार्गदर्शन कॅम्पही आयोजित करत असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी सुनिता वांणे,सुवर्णा देशमुख,पदमा औताडे,जनाबाई पवळ,शिवराज पातळे,सुनिल पेठे,सुदाम जाधव,रंजना जोशी,प्रियंका बोराडे यांच्यासह आदिंनी सहकार्य केले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.धनश्री मुनोत तर आभार नंदा राऊत यांनी मानले.


आष्टी तालुका 'रणरागिणि संघटना'
महिला शक्ती पर्व
दि०७जुलै२०१९


आष्टी तालुका 'रणरागिणि संघटना'
महिला शक्ती पर्व
दि०७जुलै२०१९



# स्मरणपत्र - 1

मा. तहसीलदार साहेब,

दि.29/01/2020

आष्टी ता. आष्टी जिल्हा बीड.

अर्जदार- रणरागिणी संघटना अध्याक्षा - प्रा. मीरा नाथ

**विषय- आष्टी तालुका अंतर्गत येणाऱ्या सर्व बस स्थानकांमधील महिला स्वच्छता गृहाच्या नूतनिकरणाबाबत.**

संदर्भ- दि. 24/08/2017 रोजीचे पत्र.

महोदय,

वरील विषयास अनुसरून, शेकडो विद्यार्थिनींच्या मिळालेल्या लेखी तक्रारी वरून विनंती करू इच्छिते की, आष्टी तालुक्यातील सर्व बस स्थाकांमधील महिला स्वच्छता गृहाची अवस्था खूप दयनिय आहे. या संदर्भात यापूर्वीही रणरागिणी महिला संघटनेच्या वतीने दि.24/08 2017 रोजी मा. तहसीलदार साहेब यांच्याकडे लेखी निवेदन दिले होते, परंतु आष्टी तालुक्यातील सर्व बस स्थानकामधील स्वच्छता गृहाची परिस्थिती जैसे थे आहे. तरी यामध्ये त्वरीत सुधारणा व्हावी कारण आष्टी तालुक्यातील कडा, आष्टी येथे आसपासच्या सर्व खेड्यातील शेकडो विद्यार्थीनी शिक्षणासाठी ये जा करतात. त्यामुळे त्यांना बस स्थानकांवर बस साठी तासंतास थांबवावे लागते कारण बस वेळेवर येत नाहीत आणि काही गावांसाठी तर एकच बस आहे. बस स्थानकांपासून शाळा, महाविद्यालय 2 ते 3 किलोमीटर अंतरावर आहेत. त्यामुळे विद्यार्थिनींच्या दृष्टीने चांगले स्वच्छतागृह असणे खूप महत्त्वाचे आहे.

कारण शेकडो विध्यर्थिनींच्या आरोग्याचा प्रश्न आहे. तरी लवकरात लवकर बस स्थानकांवरील महिला स्वच्छतागृहांची नुतनीकरण करून तेथे पाण्याची व्यवस्था करावी.विध्यर्थिनींच्या आरोग्याचा प्रश्न लक्षात घेऊन त्वरित निर्णय घेऊन सहकार्य करावे अन्यथा रणरागिणी महिला संघटने मार्फत आंदोलन करण्यात येईल.

माहितीस्तव प्रत-

1- मा. आ. सुरेश धस साहेब(आमदार-विधान परिषद बीड, उस्मानाबाद, लातूर)

2-मा. आ.बाळूकाका आजबे साहेब (आमदार-आष्टी, पाटोदा, शिरूर).

3- मा. अनिल परब साहेब (परिवहनमंत्री)

आवक-जावक लिपीक
तहसिल कार्यालय आष्टी
29-1-2020

prof. Nath M. N.

रिपोर्टर

Thursday 30-01-2020 रिपोर्टर - अक्षय विधाते

# तालुक्यातील सर्व स्वच्छतागृह तात्काळ दुरूस्त करा

## रणरागिणी संघटनेचे तहसिलदारांना निवेदन



आष्टी (रिपोर्टर): तालुक्यातील विविध शासकीय, निमशासकीय तसेच बस स्थानकातील स्वच्छतागृहे उभारण्यात आली मात्र अलिकडच्या काळात त्याकडे दुर्लक्ष केल्याने त्यांची दुरवस्था झाली असल्याने महाविद्यालयीन तरुणी तसेच महिलांची कुचंबना होत आहे.तसेच विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयात कामानिमित्त येणाऱ्या महिलांना ही या अडचणीचा सामना करावा लागत आहे. तालुक्यातील सर्वच स्वच्छतागृहे तात्काळ दुरूस्त करण्याची मागणी रणरागिणी संघटनेच्या अध्यक्षा मीरा नाथ यांनी बुधवार दि.२९ रोजी तहसीलदार यांना निवेदनाद्वारे केली आहे.

आष्टी तालुक्यातील कडा - आष्टी हि शहरे बाजारपेठे सोबतच शिक्षणाचे केंद्रे असून येथे शिक्षणासाठी परिसरातून येणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. दुपारी शाळा व महाविद्यालय सुटल्यानंतर परत गावी जाण्यासाठी अनेक विद्यार्थीनीना बसची वाट पाहत बस स्थानकात थांबावे लागते. परंतु कडा व आष्टी येथील बस स्थानकातील स्वच्छतागृहांची दुरावस्था झाली असून स्वच्छता अभावी बस स्थानक परिसरात दुर्गंधी पसरली आहे. पाणी साठविण्यासाठी बॅरल आहे परंतु त्यामध्ये पाणीच नाही. या दुर्गंधीमुळे व अस्वच्छतेमुळे महिला व विद्यार्थीनी स्वच्छतागृहात जाण्याचे टाळतात. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर ही परिणाम होऊ शकतो. अनेकवेळा रणरागिणी संघटनेने आगारप्रमुख व तहसिल कार्यालय यांना निवेदन दिले होते परंतु सदरील निवेदनाची दखल अद्यापपर्यंत घेतली नाही. त्यामुळे विद्यार्थीनींची कुचंबना होत आहे. तरी तात्काळ स्वच्छतागृह स्वच्छ करून पाण्याची व्यवस्था करावी अशी मागणी रणरागीणी संघटनेचे मीरा नाथ, सुमन खेडकर,पद्मजा औताडे, धनश्री मुनोत, मंगल टेकाडे, गायत्री जगताप, सीमा भवर, अरुणा कुलकर्णी, हेमाली बोडखे, सुनिता बोंबे, तनवीर काझी आदी महिलांनी आष्टीचे नायब तहसीलदार शारदा दळवी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

सकाळ
औरंगाबाद, गुरुवार, ३० जानेवारी २०२०

LIBRARY

# आष्टी तालुक्यातील स्वच्छतागृहांची दुरवस्था

## अनेक शासकीय कार्यालयांत स्वच्छतागृहच नाहीत



आष्टी : स्वच्छतागृहाबाबत बुधवारी प्रशासनाला देण्यात आलेले निवेदन.

**कडा, ता. २९ (बातमीदार)** : आष्टी तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांना विविध शासकीय, निमशासकीय कामासंदर्भात आष्टी येथे यावे लागते; परंतु आष्टी येथील अनेक शासकीय कार्यालयांत महिलांसाठी स्वच्छतागृहच नाहीत. कडा, आष्टी येथील बसस्थानकात स्वच्छतागृहे उभारण्यात आली; मात्र अलीकडच्या काळात त्याकडे दुर्लक्ष केल्याने दुरवस्था झाली आहे. महाविद्यालयीन तरुणी; तसेच महिलांची मोठ्या प्रमाणात कुचंबणा होत आहे.

आष्टी तालुक्यातील सर्वच स्वच्छतागृहे तत्काळ दुरुस्त करण्याची मागणी रणरागिणी संघटनेच्या अध्यक्षा मीरा नाथ यांनी बुधवारी (ता. २९) तहसीलदारांना निवेदनाद्वारे केली आहे. आष्टी तालुक्यातील कडा-आष्टी ही शहरे बाजारपेठेसोबतच शिक्षणाचे केंद्र असून, येथे शिक्षणासाठी परिसरातून येणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. दुपारी शाळा व महाविद्यालय सुटल्यानंतर परत गावी जाण्यासाठी अनेक विद्यार्थिनींना बसची वाट पाहत बसस्थानकात थांबावे लागते; मात्र कडा व आष्टी येथील बसस्थानकातील स्वच्छतागृहांची दुरवस्था झाली असून परिसरात दुर्गंधी पसरली आहे. पाणी साठविण्यासाठी बॅरल आहे; परंतु त्यामध्ये पाणीच नाही. या दुर्गंधीमुळे व अस्वच्छतेमुळे महिला व विद्यार्थिनी स्वच्छतागृहात जाण्याचे टाळतात. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होऊ लागला आहे. अनेकवेळा रणरागिणी संघटनेने आगारप्रमुख व तहसील कार्यालयांना निवेदन दिले; परंतु सदरील निवेदनाची दखल अद्याप घेतली नाही. त्यामुळे महाविद्यालयीन तरुणी व विद्यार्थिनी; तसेच महिलांची कुचंबणा होत आहे. स्वच्छतागृह स्वच्छ करून पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी रणरागिणी संघटनेचे मीरा नाथ, सुमन खेडकर, पद्मजा औताडे, धनश्री मुनोत, मंगल टेकाडे, गायत्री जगताप, सीमा भवर, अरुणा कुलकर्णी, हेमाली बोडखे, सुनीता बोंबे, तनवीर काझी आदी महिलांनी आष्टीचे नायब तहसीलदार शारदा दळवी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

# निवेदन

दि. 11 फेब्रुवारी2020

मा. पोलीस उप अधिक्षक साहेब,

आष्टी ता. आष्टी जिल्हा बीड.

अर्जदार प्रा. मीरा नाथ ( अध्यक्षा, महिला रणरागिणी संघटना)

विषय- हिंगणघाट, जिल्हा वर्धा येथील प्रा.अंकिता वर झालेल्या भ्याड हत्येचा निषेध.

मा.महोदय,

वरील विषयास अनुसरून, हिंगणघाट जिल्हा वर्धा येथील प्रा.अंकिताची झालेली निर्घृण हत्येचा तालुका रणरागिणी संघटनेच्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत आहे.तरी लवकरात लवकर आरोपी विकी नगराळे याला कठोरातली कठोर शिक्षा मिळावी. कारण त्यामुळे समाजात एक धाक निर्माण होईल. आणि अशा घातक वृत्तीला आळा बसेल. समाजात एक जागृती निर्माण होईल.

IN 1565
10/02/2020

प्रा. मीरा नाथ

( अध्यक्षा, महिला रणरागिणी संघटना)


Legal Awareness Programme for Laws Related to Women
Commission for Women
Function

सकाळ | बीड
औरंगाबाद, बुधवार, १९ फेब्रुवारी २०२०
TODAY
SakalNews | @esakalupdate | www.esakal.com
Call Center : 9225800800

Shri Amolak Jain Vidya Prasarak Mandal's ... Arts, Commerce & Science College
LIBRARY



आष्टी : रणरागिणी महिला संघटनेच्या वतीने पोलिस अधिकारी विजय लगारे यांना निवेदन देताना महिला.

# रणरागिणी संघटनेतर्फे पोलिसांना निवेदन

**कडा, ता. १८ (बातमीदार)** : हिंगणघाट येथील प्रा. अंकितावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध करून लवकरात लवकर आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी आष्टी तालुका रणरागिणी महिला संघटनेच्या वतीने उपविभागीय पोलिस अधिकारी विजय लगारे यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.

एकीकडे महिला सबलीकरणाच्या 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'च्या घोषणा द्यायच्या आणि दुसरीकडे मुलींना जाळून मारायचे हे चित्र खूपच क्लेशदायी आहे. अलीकडेच हिंगणघाट तसेच औरंगाबादमध्ये अशा स्वरूपाच्या घृणास्पद घटना घडल्या; मात्र अशा घटना घडल्यानंतर आक्रोश करण्यापेक्षा अत्याचार थांबवण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. महिलाविषयी मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे. कठोर कायद्यांसह काही मूल्य संस्कार पुढच्या पिढीला देणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने सामुदायिक प्रयत्न होणे गरजेचे आहे. म्हणूनच प्रबळ कायदा आणि जलद न्याय या माध्यमातून लोकांचा विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न व्हायला हवा, असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी संघटनेच्या प्रा. मीरा नाथ, प्रा. डॉ. सुमन खेडकर, प्रा. पद्मजा औताडे, प्रा. धनश्री मुनोत प्रा. मंगला टेकाडे, प्रा. डॉ. गायत्री जगताप, श्रीमती मनीषा होळकर प्रा. डॉ. अरुणा कुलकर्णी, प्रा. हेमाली बोडखे, प्रा. जनाबाई पवळ, प्रा. डॉ. प्रमिला घुमरे, प्रा. शैलजा कुचेकर, प्रा. सुनीता बोंबे, श्रीमती नंदा राऊत, प्रा. डॉ. तन्वीर काझी आदींनी दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

लोकमत

# रणरागिणी महिला संघटनेचे निवेदन

लोकमत न्यूज नेटवर्क

**आष्टी** : महिलांवर सातत्याने होणाऱ्या भ्याड हल्ल्याचा निषेध करणारे निवेदन येथील रणरागिणी महिला संघटनेतर्फे उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे यांना देण्यात आले.

या प्रकरणी आरोपीला कठोरातली कठोर शिक्षा मिळाली पाहिजे, अशी मागणी त्यात केली आहे. निवेदनावर महिला संघटनेचे प्रा. मीरा नाथ, प्रा. डॉ. सुमन खेडकर, प्रा. पद्मजा औताडे, प्रा. धनश्री मुनोत प्रा.मंगला टेकाडे, प्रा. डॉ. गायत्री जगताप, मनीषा होळकर, प्रा. डॉ. अरुणा कुलकर्णी, प्रा. हेमाली बोडखे, प्रा. जनाबाई पवळ, प्रा. डॉ. प्रमिला घुमरे, प्रा. शैलजा कुचेकर, प्रा. सुनीता बोंबे, श्रीमती नंदा राऊत, प्रा. डॉ. तनवीर काझी आदीच्या सह्या आहेत.

यावेळी डॉ. एन. एस.राठी, प्रा. धनश्री मुनोत, प्रा. तनवीर काझी, प्रा. कटारिया, प्रा.पाताळे, प्रा. गोंदकर, प्रा. गवळी आदींची उपस्थिती होती.

Hello Beed
Page No. 3 Feb 19, 2020
Powered by: erelego.com




Legal Awareness Programme for Laws Related to Women
National Commission for Women
Inauguration Ceremony


Legal Awareness Programme for Laws Related to Women





Awareness Programme for Laws Related to Women
Civil and Criminal Laws : Dowry Death and Domestic Violence
Sponsored by
National Commission for Women
Government of India, New Delhi
Inauguration Ceremony
Venue Seminar Hall



Smt. Shantabai Kantilal Gandhi Arts, Amolak Sc
Panalal Hiralal Gandhi Commerce College, K
Legal Awareness Programme for Laws Related
Sponsored By
National Commission for Women
Government of India, New Delhi
Inauguration Ceremony


Smt. Shantabai Kantilal Gandhi Arts, Amolak Science &
Panalal Hiralal Gandhi Commerce College, Kada
Legal Awareness Programme for Laws Related to Women
National Commission for Women
Government of India, New Delhi
Inauguration Ceremony


Legal Awareness Programme for Laws Related to Women
National Commission for Women
Inauguration Ceremony

लोकमत
हॅलो बीड
औरंगाबाद, शनिवार, दि.10 फेब्रुवारी २०२०

Jain Vidhya Prasarak Mandal's
LIBRARY
Arts, Commerce & Science College, Kada

# गांधी महाविद्यालयात कायदेविषयक जागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

आष्टी : श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालय कडा आणि राष्ट्रीय महिला आयोग भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने ११ फेब्रुवारी रोजी महिलांसाठी कायदेविषयक जागृती कार्यक्रम सकाळी ९.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे.

मंडळाचे अध्यक्ष कांतीलाल चनोदिया यांच्या अध्यक्षतेखाली आणि विश्वस्त अध्यक्ष गोकुलदास मेहेर यांच्या हस्ते डॉ. सुधा कांकरिया यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन होणार आहे.

या कार्यक्रमाअंतर्गत हुंडाबळी, कौटुंबिक अत्याचार संबंधित कायद्यांची माहिती देण्यासाठी नगर येथील डॉ सुधा कांकरिया, अड. प्रशांत मोरे, अड.प्रजा हेंद्रे जोशी तसेच आष्टी येथील पोलीस उपअधीक्षक विजय लगारे आदी मान्यवर मार्गदर्शन करणार आहे. या कार्यक्रमाचा जास्तीत जास्त महिलांनी, विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. राठी व उपप्राचार्य डॉ. जे. एम. भंडारी यांनी केले आहे.

सकाळ | बीड
औरंगाबाद, गुरुवार, १३ फेब्रुवारी २०२०
TODAY
f SakalNews | @esakalupdate | www.esakal.com
Call Center : 9225300800

## गांधी महाविद्यालयात कायदेविषयक जनजागृती

**कडा :** येथील गांधी महाविद्यालयात मंगळवारी (ता. १२) महिलांसाठी कायदेविषयक जनजागृती शिबिर झाले. अध्यक्षस्थानी कांतीलाल चानोदिया, होते. संस्थेचे गोकुळदास मेहेर यांच्या हस्ते उद्घाटन झाले. डॉ. सुधा कांकरिया, ॲड. प्रशांत मोरे, प्रज्ञा हेंद्रे (जोशी); तसेच आष्टीचे उपविभागीय पोलिस अधिकारी विजय लगारे, प्राचार्य डॉ. एन. एस. राठी यांची उपस्थिती होती. यावेळी बेटी बचाओ व स्त्रीभ्रूण हत्येविषयी शपथ देण्यात आली. हेमंतकुमार पोखरणा, योगेशकुमार भंडारी, अनिलकुमार झाडमुथा, डॉ. उमेश गांधी, संचालक बाबूशेठ भंडारी, उपप्राचार्य जे. एम. भंडारी, प्रा. ए. पी. कटारिया, प्रा. डॉ. एस. आर. मगर, प्रा. एन. टी. गवळी, संयोजक प्रा. धनश्री मुनोत, सहसंयोजक प्रा. मीरा नाथ, प्रा. डॉ. अरुणा कुलकर्णी, प्रा. डॉ. सुपर्णा देशमुख, प्रा. डॉ. तन्वीर काझी, अनिता टकले आदींची उपस्थिती होती. प्रा. धनश्री मुनोत यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. अनिल गर्जे यांनी आभार मानले.

LIBRARY

CMYK
पार्श्वभूमी
शनिवार १५ फेब्रुवारी २०२०

LIBRARY
Jain Vidya Prasarak Mandal's ... Gandhi Arts, Commerce & Science College, Kada

# गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय कायदे विषयक जनजागृती कार्यक्रम संपन्न

आष्टी दि.१४ (प्रतिनिधी):- आष्टी तालुक्यातील कडा येथील अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालयात गांधी महाविद्यालय व राष्ट्रीय महिला आयोग भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी कायदे विषयक जन जागृती कार्यक्रम मंगळवार दि ११/०२/२०२० रोजी संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमोलक संस्थेचे अध्यक्ष कांतीलाल चानोदिया तर व उद्घाटक म्हणून संस्थेचे गोकुलदास मेहेर हे होते. या कार्यक्रमाला डॉ सुधा कांकरिया प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर या कार्यक्रमाला अहमदनगर येथील सुप्रसिद्ध वकील प्रशांत मोरे, प्रज्ञा हेंद्रे (जोशी) तसेच आष्टीचे उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एन एस राठी म्हणाले की, महिलांवरील अत्याचार थांबण्यासाठी समाजातील मनोवृत्ती, विचारात दृष्टिकोनात बदल होणे आवश्यक आहे. हे बदल चांगले संस्कार देण्याचे काम एक स्त्री व आईच करू शकते असे म्हणत मातेचे अनेक उदाहरण दिले. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने 'बेटी' च्या स्वागतासाठी प्राचार्य राठी यांनी एक रुपया देण्याचे सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांना आवाहन करून सर्वानुमते तसा ठराव पास केला. यावेळी अहमदनगर येथील सुप्रसिद्ध वकील प्रशांत मोरे यांनी 'हुंडाबळी' व प्रज्ञा हेंद्रे (जोशी) यांनी 'महिलांचे होणारे मानसिक छळ' विषयी कायद्याची माहिती दिली. आष्टीचे उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, महिलांच्या सुरक्षिततेसाठी असलेले विविध कलम व माहिती देत विविध हेल्पलाईन नंबर ही दिले. महिलांवर होणारे अत्याचार कमी करण्यासाठी समाजातील नागरिकांची मानसिकतेत बदल खूप गरजेचे आहे. स्त्रीवरील अत्याचार रोखण्यासाठी आणि सुरक्षिततेसाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. या कार्यक्रमाला संस्थेचे सचिव हेमंतकुमार पोखरणा, योगेशकुमार भंडारी, अनिलकुमार झाडमुथ्था, कोषाध्यक्ष डॉ उमेश गांधी, संचालक बाबूशेठ भंडारी, उपप्राचार्य जे एम भंडारी आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाला प्रा. एपी कटारिया, प्रा. डॉ. एस आर मगर, प्रा. एन टी गवळी, संयोजक प्रा. धनश्री मुनोत, सह संयोजक प्रा. मीरा नाथ, प्रा. डॉ अरुणा कुलकर्णी, प्रा. डॉ. सुपर्णा देशमुख, प्रा. डॉ तन्वीर काझी, टकले अनिता यांच्यासह सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका व प्राध्यापकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचलन प्रा धनश्री मुनोत यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ अनिल गर्जे यांनी मानले.

झुंजार नेता

• दिनांक : १६ फेब्रुवारी २०२० • वार: रविवार • पान ३


# गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय कायदे विषयक जनजागृती कार्यक्रम संपन्न

कडा, दि.१५ (प्रतिनिधी ):- आष्टी तालुक्यातील कडा येथील गांधी महाविद्यालय व राष्ट्रीय महिला आयोग भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी कायदे विषयक जन जागृती कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमोलक संस्थेचे अध्यक्ष कांतीलाल चानोदिया तर व उद्घाटक म्हणून संस्थेचे गोकुलदास मेहेर हे होते. या कार्यक्रमाला डॉ. सुधा कांकरिया प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ॲड. प्रशांत मोरे, प्रज्ञा हेंद्रे तसेच आष्टीचे उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. राठी म्हणाले की, महिलांवरील अत्याचार थांबण्यासाठी समाजातील मनोवृत्ती, विचारात दृष्टिकोनात बदल होणे आवश्यक आहे. हे बदल चांगले संस्कार देण्याचे काम एक स्त्री व आईच करू शकते असे म्हणत मातेचे अनेक उदाहरणे दिले. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने 'बेटी'च्या स्वागतासाठी प्राचार्य राठी यांनी एक रुपया देण्याचे सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांना आवाहन करून सर्वानुमते तसा ठराव पास केला. यावेळी प्रशांत मोरे यांनी 'हुंडाबळी' व प्रज्ञा हेंद्रे (जोशी) यांनी 'महिलांचे होणारे मानसिक छळ' विषयी कायद्याची माहिती दिली. आष्टीचे उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, महिलांच्या सुरक्षिततेसाठी असलेले विविध कलम व माहिती देत विविध हेल्पलाईन नंबर ही दिले. महिलांवर होणारे अत्याचार कमी करण्यासाठी समाजातील नागरिकांची मानसिकतेत बदल खूप गरजेचे आहे. स्त्रीवरील अत्याचार रोखण्यासाठी आणि सुरक्षिततेसाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.या कार्यक्रमाला संस्थेचे सचिव हेमंतकुमार पोखरणा, योगेशकुमार भंडारी, अनिलकुमार झाडमुथ्था, कोषाध्यक्ष डॉ. उमेश गांधी, संचालक बाबूशेठ भंडारी, उपप्राचार्य जे एम भंडारी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. धनश्री मुनोत यांनी व उपस्थितांचे आभार प्रा.डॉ अनिल गर्जे यांनी मानले.

सकाळ
शनिवार, २२ फेब्रुवारी २०२०

LIBRARY

# अत्याचार रोखण्यासाठी कायद्याच्या अंमलबजावणीची गरज : कांकरिया

सकाळ वृत्तसेवा

नगर, ता. २० : "बदलत्या काळात आजची स्त्री समाजामध्ये कुठेच सुरक्षित नाही. दिवसेंदिवस अत्याचाराच्या घटनांत वाढ होत आहे. स्त्रियांवरील अत्याचार रोखण्यासाठी कायद्याची कडक अंमलबजावणी होणे गरजेचे आहे," असे प्रतिपादन 'बेटी बचाव'च्या राष्ट्रीय प्रणेत्या डॉ. सुधा कांकरिया यांनी केले.

आष्टी (जि. बीड) येथे अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालय व राष्ट्रीय महिला आयोगातर्फे महिलांसाठी कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम नुकताच पार पडला. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष कांतिलाल चानोदिया, सचिव हेमंतकुमार पोखरणा, गोकुळदास मेहेर, योगेशकुमार भंडारी, डॉ. उमेश गांधी, जे. एम. भंडारी आदी उपस्थित होते. कांकरिया म्हणाल्या, "स्त्री-भ्रूणहत्येचे प्रमाण वाढत असल्याने मुलींच्या संख्येत घट होत आहे. स्त्री-पुरुषांमध्ये कायद्याविषयीची जागृती होणे गरजेचे आहे."

ॲड. प्रशांत मोरे यांनी हुंडाबळी व प्रज्ञा हेंद्रे यांनी महिलांच्या होणाऱ्या मानसिक छळाविषयी कायद्याची माहिती दिली. प्रास्ताविक प्राचार्य एन. एस. राठी यांनी केले. धनश्री मुनोत यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अनिल गर्जे यांनी आभार मानले.




आष्टी (जि. बीड) : महिलांसाठी आयोजित कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमात बोलताना 'बेटी बचाव'च्या राष्ट्रीय प्रणेत्या डॉ. सुधा कांकरिया. दै. सकाळ दि. 21.2.2020




जागतिक महिला दिन
८ मार्च २०२०


Smt. Shantabai Kantilal Gandhi Arts, Amolak Science &
P. H. Gandhi Commerce College, Kada,
महिला दिन


जागतिक महिला दिन
८ मार्च २०२०





# गांधी महाविद्यालयात महिला दिन उत्साहात साजरा



आष्टी (प्रतिनिधी ):- अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालयात महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी राजमाता जिजाऊ व सावित्री बाई फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.

जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे प्रस्ताविक करतांना प्रा. मीरा नाथ(रणरागिनी महिला संघटना अध्यक्ष) म्हणाल्या की महिलांन मध्ये उत्तम व्यावसायिक व उद्योजकाचे गुण

(पान दोनवर)






Smt. Shantabai Kantilal Gandhi Arts, Amolak Science &
P. H. Gandhi Commerce College, Kada,
जागतिक महिला दिन
८ मार्च २०२१




Smt. Shantabai Kantilal Gandhi Arts, Amolak Science &
P. H. Gandhi Commerce College, Kada,
जागतिक महिला दिन
८ मार्च २०२१


P. H. Gandhi Commerce College, Kada,
EURO PRATIK
EURO PRATIK

सकाळ

## गांधी महाविद्यालयात महिला दिन साजरा

कडा : येथील गांधी महाविद्यालयात सोमवारी (ता.८) जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एन.एस. राठी होते. तर डॉ पुनम मार्कंडे, उपप्राचार्य जे. एम. भंडारी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. मीरा नाथ यांनी केले. अध्यक्षीय समारोप डॉ. राठी यांनी केला. डॉ. पुनम मार्कंडे, उपप्राचार्य जे. एम. भंडारी यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ. अरुणा कुलकर्णी यांनी केले. आभार प्रा नवनाथ विधाते यांनी मानले.



कडा : येथील गांधी महाविद्यालयात महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य एन.एस. राठी, उपप्राचार्य जे.एम. भंडारी, प्रा.मीरा नाथ, प्रा. बोंबे आदी.

दैनिक युवा सोबती

09 मार्च 2021

जावेद पठाण प्रतिनिधी आष्टी

# गांधी महाविद्यालय येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



आष्टी (प्रतिनिधी):-आष्टी तालुक्यातील कडा येथील श्री अमोलक जैन प्रसारक मंडळाच्या गांधी महाविद्यालयात महिला विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य

(पान दोनवर)

एन एस राठी तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ पुनमताई मार्कंडे उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा मीरा नाथ म्हणाल्या की, उच्च शिक्षित महिलांनी इतर महिलांसाठी उभ राहून त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देऊन प्रवाहात आणणे काळाची गरज आहे. तसेच स्त्री- पुरुष समानता हा जगण्याचा भाग होण्यासाठी आपल्या शिक्षण प्रणालीमध्ये एल केजी पासून उच्च शिक्षणापर्यंत स्त्रीच्या आदराचे, तिच्या महानतेचे, गौरवाचे धडे बालमनावर बिबवावे लागतील तेव्हाच समाजाची मानसिकता बदलेल असे ही प्रा. मीरा नाथ म्हणाल्या.

यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. पुनम मार्कंडे आपल्या भाषणात म्हणाल्या की, स्त्रीने आपल्या आरोग्याविषयी जागृत होऊन स्वत:साठी वेळ देऊन नियमित योगा करावा. भारतीय संस्कृती नुसार आपल्या परिसरातील पिकलेला आहारच खावा. महिला व विद्यार्थीनिनी पुस्तकाशी मैत्री करावी तसेच इंटरनेटचा कमी वापर करावा, कारण त्यामुळे आपल्या आरोग्यावर खूप घातक परिणाम होतो. यावेळी महिलांच्या अनेक समस्याचे निरसण त्यांनीं केले.

यावेळी उपप्राचार्य जे एम भंडारी यांनी आपल्या भाषणात म्हणाले की, आपल्या देशातील अनेक महिलांनी प्रत्येक क्षेत्रात भरारी घेतली असून त्याचा आपल्या देशाला फार मोठा फायदा झाला आहे. कामा बरोबरच महिलांनी आपल्या आरोग्याची काळजी घेणं ही खूप महत्त्वाचे आहे. आपल्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एन एस राठी म्हणाले की, कर्तृत्ववान महिलांचे प्रेरणादायी उदाहरणे देऊन स्त्रीची महत्ती सांगितली. तसेच कोरोना काळात हा स्त्रियांनी खूप मोठे सहकार्य केले असे ही डॉ राठी म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अरुणा कुलकर्णी यांनी केले. यावेळी प्रा. सुनिता बोंबे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. कार्यक्रमाचे आभार प्रा नवनाथ विधाते यांनी मानले. या कार्यक्रमाला आशावर्कर, विद्यार्थिनी, प्राध्यापिका, प्राध्यापक तसेच महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

दैनिक लोकाशा
महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा
09MAR2021

rajendra jain kada

# कड्यात गांधी महाविद्यालयात जागतीक महिला दिन साजरा

कडा, दि.९ (लोकाशा न्युज):-येथील अमोलक जैन शिक्षण संस्थेच्य महिला व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्य अध्यक्षस्थानी प्राचार्य एन. एस. राठी तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ पुनम मार्कंडे उपस्थित होत्या.




यावेळी बोलताना डॉ. मार्कंडे म्हणाल्या की, महिलांनी आपल्या आरोग्याची काळजी घेततानाच, आहाराबरोबरच नयमित व्यायामाला महत्व देण्याची गरज आहे. तसेच बौध्दीक क्षमता वाढीसाठी महिला आणि विद्यार्थीनींनी पुस्तकांची मैत्री करावी. इंटरनेटच्या अति वापरामुळे आरोग्यावर घातक परिणाम होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगीतले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य राठी, उपप्राचार्य भंडारी व इतरांनी जागतिक महिला दिनानिमित्त उपस्थित भगिनींना शुभेच्छा देऊन मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक श्रीमती प्रा. नाथ केले, सूत्रसंचालन प्रा. कुलकर्णी यांनी तर आभार प्रा. विधाते यांनी मानले. यावेळी प्राध्यापक, प्राध्यापिका आशा स्वयंसेविका, विद्यार्थिनी तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.


GPS Map Camera
Kada, Maharashtra, India
V3RH+5X3, Kada, Maharashtra 414202, India
Lat 18.890291°
Long 75.079921°
03/01/22 11:07 AM
Google







कार्यारंभ
Friday 2022/03/11

# कडा येथील गांधी विद्यालयात महिला दिन उत्साहात साजरा



प्रतिनिधी। कडा

दि.१० : आष्टी तालुक्यातील कडा येथील अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालयात मंगळवारी (दि.८) ागतिक महिला दिनानिमित्त महिला विभाग, एनएसएस विभाग आणि नॅक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने उज्वल भविष्यासाठी स्त्री पुरुष समानता या विषयावर आष्टी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री शिंदे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात माँ जिजाऊ आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजन तसेच नारीशक्तीच्या गीताने झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.एस.राठी हे होते. तर प्रमुख उपस्थितीत डॉ. जयश्री शिंदे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. जे. एम. भंडारी आदी होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रणरागिनी महीला संघटनेच्या अध्यक्ष डॉ. मीरा नाथ यांनी केले. आकांक्षा भोसले आणि भाग्यश्री पवार या दोन विद्यार्थिनींनी स्त्री शक्तीवर कविता सादर केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अरुणा कुलकर्णी यांनी केले उपस्थितांचे आभार प्रा. धनश्री मुनोत यांनी व्यक्त केले. याप्रसंगी प्रा. सुनिता बोंबे, डॉ. सुपरणा देशमुख,एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी डॉ. नवनाथ विधाते, नॅक समन्वयक डॉ.नरेंद्र गवळी तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मराठवाडा साथी

# गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा



**आष्टी/प्रतिनिधी**

कडा येथील श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालयात मंगळवार दिनांक ८ मार्च २०२२ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त महिला विभाग, एनएसएस विभाग आणि नॅक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने उज्वल भविष्यासाठी स्त्री पुरुष समानता या विषयावर आष्टी तालुका आरोग्य अधिकारी ..**(पान ४ वर)**

डॉ. जयश्री शिंदे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात माँ जिजाऊ आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने तसेच नारीशक्ती च्या गीताने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना रणरागिनी महीला संघटनेच्या अध्यक्षा डॉ. मीरा नाथ म्हणाल्या की, स्त्रीशक्तीने असे एकही क्षेत्र सोडले नाही. प्रत्येक क्षेत्रात स्वतःला सिद्ध केले आहे. तरीही एकशे पंचवीस वर्षापासून स्त्री स्त्री–पुरुष समानतेसाठी लढत आहे. हा खरच एक चिंतनाचा विषय आहे. प्रत्येक उच्चशिक्षीत महिलांनी आपल्या परिसरातील सर्व गरजू महिलांना मदतीचा हात द्यावा असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. आष्टी तालुक्यातील प्रत्येक शाळा–महाविद्यालयात संघटनेमार्फत स्त्री संरक्षण प्रशिक्षण वर्ग चालू करण्याचा मानस आहे असेही त्या म्हणाल्या . प्रमुख मार्गदर्शक डॉ. जयश्री शिंदे याप्रसंगी म्हणाल्या की ग्रामीण भागातील मुलींना पुढे जाताना खूप कठीण परिस्थितीला सामोरे जावे लागते परंतु प्रामाणिक कष्ट आणि इच्छाशक्तीच्या जोरावर त्या नक्कीच पुढे जातील आणि यशस्वी होतील हे सांगताना त्यांनी अनेक प्रेरणादायी दाखले दिले. तसेच स्त्री–पुरुष समानतेसाठी मुलांना पुढाकार घेण्याचे आवाहनही केले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. जे. एम. भंडारी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना आरोग्य विभागातील सर्व स्त्रियांनी कोरोणा काळात दिलेल्या योगदानाबद्दल विशेष गौरवोद्गार काढले. तसेच जागतिक महिला दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.एस.राठी म्हणाले की प्रत्येक पुरुषाला मोठे करण्यामागे स्त्रीशक्तीचा कार्यभाग असतोच असे सांगत संत मुक्ताई, जिजाऊ यासारख्या अनेक कर्तबगार स्त्रियांचे दाखले दिले. महिला आजच नव्हे तर अनेक वर्षापासून इतिहास घडवत आहे अशा विश्वातील सर्व महिलांना जागतिक महिला दिनानिमित्त वंदन करून महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. आकांक्षा भोसले आणि भाग्यश्री पवार या दोन विद्यार्थिनींनी स्त्री शक्तीवर कविता सादर केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अरुणा कुलकर्णी यांनी केले उपस्थितांचे आभार प्रा. धनश्री मुनोत यांनी मानले. याप्रसंगी प्रा. सुनिता बोंबे, डॉ.सुपर्णा देशमुख, एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी डॉ. नवनाथ विधाते, नॅक समन्वयक डॉ.नरेंद्र गवळी तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रिपोर्टर
Friday 11-03-2022

# गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा

आष्टी (रिपोर्टर) तालुक्यातील कडा येथील श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालयात मंगळवार दिनांक ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त महिला विभाग, एनएसएस विभाग आणि नॅक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने उज्वल भविष्यासाठी स्त्री पुरुष समानता या विषयावर आष्टी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री शिंदे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात माँ जिजाऊ आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने तसेच नारीशक्तीच्या गीताने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना रणरागिनी महीला संघटनेच्या अध्यक्षा डॉ.



मीरा नाथ म्हणाल्या की, स्त्रीशक्तीने असे एकही क्षेत्र सोडले नाही. प्रत्येक क्षेत्रात स्वतःला सिद्ध केले आहे. तरीही एकशे पंचवीस वर्षापासून स्त्री स्त्री-पुरुष समानतेसाठी लढत आहे. हा खरच एक चिंतनाचा विषय आहे. प्रत्येक उच्चशिक्षीत महिलांनी आपल्या परिसरातील सर्व गरजू महिलांना मदतीचा हात द्यावा असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. आष्टी तालुक्यातील प्रत्येक शाळा-महाविद्यालयात संघटनेमार्फत स्त्री संरक्षण प्रशिक्षण वर्ग चालू करण्याचा मानस आहे असेही त्या म्हणाल्या. प्रमुख मार्गदर्शक डॉ. जयश्री शिंदे याप्रसंगी म्हणाल्या की ग्रामीण भागातील मुलींना पुढे जाताना खूप कठीण परिस्थितीला सामोरे जावे लागते परंतु प्रामाणिक कष्ट आणि इच्छाशक्तीच्या जोरावर त्या नक्कीच पुढे जातील आणि यशस्वी होतील हे सांगताना त्यांनी अनेक प्रेरणादायी दाखले दिले. तसेच स्त्री-पुरुष समानतेसाठी मुलांना पुढाकार घेण्याचे आवाहनही केले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. जे. एम. भंडारी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना आरोग्य विभागातील सर्व स्त्रियांनी कोरोणा काळात दिलेल्या योगदानाबद्दल विशेष गौरवोद्गार काढले. तसेच जागतिक महिला दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.एस.राठी म्हणाले की प्रत्येक पुरुषाला मोठे करण्यामागे स्त्रीशक्तीचा कार्यभाग असतोच असे सांगत संत मुक्ताई, जिजाऊ यासारख्या अनेक कर्तबगार स्त्रियांचे दाखले दिले. महिला आजच नव्हे तर अनेक वर्षापासून इतिहास घडवत आहे अशा विश्वातील सर्व महिलांना जागतिक महिला दिनानिमित्त वंदन करून महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. आकांक्षा भोसले आणि भाग्यश्री पवार या दोन विद्यार्थिनींनी स्त्री शक्तीवर कविता सादर केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अरुणा कुलकर्णी यांनी केले उपस्थितांचे आभार प्रा. धनश्री मुनोत यांनी मानले. याप्रसंगी प्रा. सुनिता बोंबे, डॉ.सुपर्णा देशमुख, एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी डॉ. नवनाथ विधाते, नॅक समन्वयक डॉ.नरेंद्र गवळी तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**कडा : महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमास उपस्थित शिक्षिका व विद्यार्थिनी.**

# जागतिक महिला दिनानिमित्त गांधी महाविद्यालयात व्याख्यान

**कडाः** येथील गांधी महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त उज्ज्वल भविष्यासाठी स्त्री पुरुष समानता या विषयावर आष्टी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री शिंदे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रमाता जिजाऊ आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने तसेच नारीशक्तीच्या गीताने झाली. प्रास्ताविक डॉ. मीरा नाथ यांनी केले. डॉ. जयश्री शिंदे, डॉ. जे.एम.भंडारी, प्राचार्य डॉ. एन.एस.राठी यांनी मार्गदर्शन केले. आकांक्षा भोसले आणि भाग्यश्री पवार यांनी स्त्री शक्तीवर कविता सादर केल्या. सूत्रसंचालन डॉ. अरुणा कुलकर्णी यांनी केले. उपस्थितांचे आभार धनश्री मुनोत यांनी मानले. याप्रसंगी प्रा.सुनिता बोंबे, डॉ. सुपर्णा देशमुख, डॉ. नवनाथ विधाते, डॉ.नरेंद्र गवळी तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.